# देशदूत

शिल्पकार विकासाचा...

आज भविष्यवेध

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक २६१ । गुरुवार, दि.१८ सप्टेंबर २०२५ । पाने-८+८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## शरद पवारांच्या मोदींना शुभेच्छा

**मुंबई ।** १७ सप्टेंबर हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस. या काळात जसे मोदींचे चाहते वाढले तसेच, त्यांच्यावर टीका करणाऱ्यांची संख्याही प्रचंड वाढली. मोदींना राबवलेल्या योजनांवर विरोधकांकडून सातत्याने टीका करण्यात येते. महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते शरद पवार हे देखील सातत्याने मोदींच्या काही योजनांवर टीका करताना दिसतात. पण पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी खास शुभेच्छा दिल्या आहेत.




## संपादकीय

### हे येरा गबाळाचे काम नोहे!

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना पुन्हा एकदा मुदतवाढ दिली गेली आहे. सरकारला काय लागते निवडणुका पुढे ढकलायला? इच्छुकांची दुखणी तेच जाणोत. नाही तरी 'ज्याचे जळते त्यालाच तर कळते.' कार्यकर्त्यांनी आणखी किती काळ स्थानिक निवडणुकीची वाट पाहायची? त्याला काही मर्यादा? आताही निवडणुका पुढे ढकलल्या गेल्याने 'कोणाची म्हैस अन् कोणाला उठबैस' अशी भावना तमाम इच्छुकांच्या मनात निर्माण झाली असणार. एखाद्या रुग्णाला प्राणवायू कमी पडल्यासारखीच त्यांची अवस्था झाली असणार. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे स्थानिक इच्छुकांचा प्राणवायूच की. आमदारकी आणि खासदारकीपर्यंत सामान्य कार्यकर्त्यांची धाव पोहोचणे अंमळ अवघडच. म्हणूनच बहुसंख्य सामान्य कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची स्वप्ने पडत असतात. त्या निवडणुकीत इच्छुकांची भाऊगर्दी त्यामुळेच असते. पण म्हणून गावपातळीवरील निवडणूक लढवणे म्हणजे तोंडाची गोष्ट नव्हे. तोही कोट्यवधींचाच खेळ आहे हे का सरकारला ठाऊक नाही? याही निवडणुकांमध्ये सर्व प्रकारचे 'बळ' वापरावे लागते. इच्छुकही जास्त आणि विरोधकही जास्त अशी परिस्थिती असते. बरे राज्य किंवा देश पातळीवर पक्ष निवडणूक लढवतात. खालच्या स्तरावरील निवडणुकीत पक्षही फारसा कामात येत नाही असे म्हणतात. कारण या निवडणुकीत वैयक्तिक संबंध आणि प्रतिमा कामास येते असे मानले जाते. हे इच्छुकांसाठी आव्हानच नाही का? स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी दहा दहा वर्षे आधीपासून करावी लागते. सत्तेच्या तळ्यातील पाणी चाखणाऱ्यांना लढाई तुलनेने सोपी जाईल असे निदान वाटते तरी; पण सत्तासुंदरी सर्वांच्याच गळ्यात माळ टाकत नाही. त्यामुळे इच्छुकांना सतत चर्चेत राहावे लागते. त्यासाठीचे वेगवेगळे मार्ग शोधावे लागतात. समाजमाध्यमांवर वावर दाखवावा लागतो. कार्यकर्त्यांना वर्षानुवर्षे सांभाळावे लागते. डोळ्यात तीळ घालून सगळे हौसे, नवसे आणि गवसे निवडणूक जाहीर होण्याची वाट बघतात. तसे वारे वाहू लागले की अस्तित्व दाखवणे सुरू होते. सार्वजनिक सण-समारंभ हा त्याचा एक प्रचलित मार्ग पान २ वर

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1425 |
| नवती (२) | : 1225 |

### मिश्कीली




# सत्ताधारी पक्षाच्या कार्यक्रमात जायला वेळ; शेतकरी वाऱ्यावर!

## माजी मंत्री बच्चू कडूंच्या उपस्थितीत माजी खासदार उन्मेष पाटलांनी जिल्हाधिकाऱ्यांना घेरले

रवींद्र पाटील । जळगाव

गेल्या अनेक दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.शेतकरी हतबल झाला



त्यामुळे तो रस्त्यावर उतरला. शासनाला धडकी भरेल असा मोर्चा जळगावात निघाला. आमच्या मागण्यांची दखल घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी मोर्चाला सामोरे जावे ही रास्त अपेक्षा असताना जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी ती नाकारली सत्ताधारी पक्षाच्या राजकीय रॅलीत त्यांना सहभागी होण्यासाठी वेळ आहे मात्र शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेण्यात त्यांना रस नाही असा घणाघात माजी खासदार उन्मेश पाटील यांनी केला.शासनाला समस्या



सोडवायच्या नाही.त्यामुळे मंत्री प्रशासनाच्या आड लपण्याचा प्रयत्न करीत असल्याचे देखील पाटील यांनी 'देशदूत'शी बोलतांना सांगितले.

जळगावात बुधवारी शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता.यामोर्चात जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षाचे कायकर्ते व शेतकरी सहमागी झाले होते.माजी मंत्री बच्चू कडू देखील यावेळी हजर होते.शिवतिर्थ मैदानापासून या मोर्चाला प्रारंभ झाला.त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नेत्यांची भाषण झाली यावेळी जिल्हाधिकारी अथवा त्यांचा प्रतिनिधी निवेदन स्विकारण्यासाठी यावा अशी मागणी करण्यात आली.मात्र प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालयाचे गेट बंद केल्याने गोंधळ उडाला.

यावेळी मोर्चात सहभागी झालेले माजी आमदार बच्चू कडू चांगलेच संतापले तर उन्मेश पाटील देखील आक्रमक



झाले. प्रशासनातील अधिकाऱ्यांनी भेदभाव न करता काम करायला हवे. सत्ताधारी मंत्र्यांच्या मागे-पूढे कार्यकर्त्यांसारखे फिरतानांचे फोटो आम्ही पाहिले आहे.सत्ताधारी राजकीय पक्षांच्या रॅलीत सहभागी होण्याचे यांचे व्हिडीओ राज्यात फेमस झाले.मग शेतकऱ्यांचे निवेदन स्विकारायला यांना कोणता प्रोटोकॉल आडवा आला अशी घणाघाती टीका करीत त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचे गेट खोलत आत प्रवेश केला. त्यानंतर आंदोलकर्ते आत घुसल्याने एकच गोंधळ उडाला.

# नवा भारत घाबरत नाही!

## पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानला ठणकावले

**भोपाळ ।** भारताच्या शूर जवानांनी केलेल्या ऑपरेशन सिंदूरमुळे डोळ्यांची पापणी लवते न लवते इतक्यात पाकिस्तानाला गुडघे टेकवावे लागले,असा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बुधवारी मध्यप्रदेशातील धार येथील सभेत केला आहे. पंतप्रधानांच्या ७५ वा वाढदिवसादिवसानिमित्त आयोजित या कार्यक्रमात मोदींनी भारतीय सेनेच्या कामगिरीचे कौतुक केल आहे.



पंतप्रधानांनी पुढे पाकिस्तानवर निशाणा साधताना म्हटले की, कालच जगभराने पाहिले, एका पाकिस्तानी दहशतवाद्याने स्वतःचे हाल सांगताना रडक्या स्वरात कबुली दिली. हेच आहे नवे भारताचे स्वरूप. अण्वस्त्राच्या धमक्यांना नवा भारत घाबरत नाही. आम्ही घरात शिरून मारण्याची ताकद ठेवतो. आणि हे कालच एका पाकिस्तानी दहशतवाद्यानेही जाणले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, मातृभूमीच्या सुरक्षेपेक्षा मोठं आमच्यासाठी काही नाही. पाकिस्तानी दहशतवाद्यांनी आपल्या बहिणींच्या आणि मुलींच्या कपाळावरील सिंदूर पुसला होता. त्याला प्रत्युत्तर देताना भारताने ऑपरेशन सिंदूर राबवले आणि दहशतवादी तळ उद्धवस्त केले. आपल्या शूर जवानांनी डोळ्याच्या पापणी लवते न लवते इतक्यात मला पाकिस्तनला गुडघ्यावर आणले.

२२ एप्रिलला जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने प्रत्युत्तरात पाकिस्तानवर निर्णायक कारवाई केली. त्यावर भर देत पंतप्रधानांनी भारतीय लष्कराबाबत कौतुकोद्गार काढले आहेत. तर ७ मे ला बहावलपूर येथे झालेल्या भारतीय हवाई दलाच्या कारवाईत जैश-ए-मोहम्मदच्या मुख्यालयावर मोठा प्रहार करण्यात आला होता. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये जैशच्या कमांडरने स्वतः मान्य केले की, ऑपरेशन सिंदूरमुळे दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार मसूद अझहरचे कुटुंब उद्धस्त झाले आहे.

आपल्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त पंतप्रधान मोदींनी धार जिल्ह्यात स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानाचा शुभारंभ केला. महिलांच्या आरोग्य आणि सक्षमीकरणासाठी हे अभियान महत्वाचे ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. त्याचबरोबर राज्यातील ८ वा राष्ट्रीय पोषण महिना मोहिमेचीही सुरुवात त्यांनी केली.

याशिवाय, पंतप्रधानांनी आदी सेवा पर्वचे उद्घाटन केले तसेच भेंसोला गावात उभारण्यात येणाऱ्या पीएम मित्र पार्क चा भूमिपूजन सोहळाही पार पाडला. हा पार्क मध्यप्रदेशातील वस्त्रोद्योगाला नवे बळ देईल आणि युवकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## पाकिस्तान पुन्हा सरेंडर!

### बहिष्कारानंतर यूएई विरुध्द मैदानात

**दुबई ।** आशिया कपचा १० वा सामना बुधवारी दुबईमध्ये पाकिस्तान आणि यजमान युएई यांच्यात खेळला गेला. तथापि, पाकिस्तानी संघाने सामन्यापूर्वी बराच नाट्यमय खेळ केला. प्रथम, पाकिस्तानने खेळण्यास नकार दिला आणि नंतर, एक तासानंतर, संघ स्टेडियममध्ये रवाना झाला. सुपर फोरसाठी हा सामना महत्त्वाचा होता.


सामन्याच्या सुमारे एक तास आधी, पाकिस्तानी माध्यमांनी दावा केला होता की पाकिस्तान युएईविरुद्ध खेळणार नाही. पाकिस्तानी संघ हॉटेलमधून मैदानावर पोहोचलाही नव्हता. आयसीसीने या सामन्यासाठी मॅच रेफरी अँडी पायक्रॉफ्ट यांना काढून टाकण्यास नकार दिला. पाकिस्तानने आयसीसीकडे दोन मागण्या केल्या होत्या. पहिली म्हणजे भारत-पाकिस्तान सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांनी माफी मागावी आणि दुसरी म्हणजे पहलगामचा उल्लेख करून घटनेचे राजकारण केल्याबद्दल टीम इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादव यांना शिक्षा व्हावी.



जर पाकिस्तानने हा सामना खेळला नाही तर ते आशिया कप स्पर्धेतून बाहेर पडणार होते. की रविवारी भारत-पाकिस्तान सामन्यानंतर टीम इंडियाच्या खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन करण्यास नकार दिला. पाकिस्तानी संघाने यासाठी मॅच रेफरी अँडी पायक्रॉफ्ट यांना जबाबदार धरले.

## मराठ्यांचे वादळ दिल्लीत धडकणार

**धाराशिर्व ।** मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मोठा लढा उभारला, त्यांच्या मुंबईतील आंदोलनाला मोठ यश आले आहे, त्यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्यात सरकारने हैदराबाज गॅझेट लागू करण्यासंदर्भातील जीआर काढला आहे. हा मराठा समाजाचा मोठा विजय मानला जात आहे, राज्यात लवकरच सातारा गॅझेट देखील लागू होण्याची शक्यता आहे. याच दरम्यान आता मनोज जरांगे पाटील यांनी मोठी घोषणा केली आहे, मराठ्यांचे वादळ आता दिल्लीमध्ये धडकणार आहे. मनोज जरांगे पाटील यांनी चलो दिल्लीचा नारा दिला आहे. देशभरातील मराठा समाजाचे ते दिल्लीमध्ये अधिवेशन घेणार आहेत. लवकरच अधिवेशनाची तारीख जाहीर होणार आहे. हैदराबाद गॅझेट, सातारा गॅझेटच्या अंमलबजावणी नंतर दिल्लीमध्ये मराठा समाजाचे अधिवेशन होणार आहे. धाराशिवमध्ये हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात झालेल्या बैठकीमध्ये मनोज जरांगे पाटील यांनी ही घोषणा केली आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मुंबईमध्ये काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी उपोषणाला सुरुवात केली होती, लाखो मराठा बांधव हे जरांगे पाटील यांच्या आंदोलनामध्ये सहभागी झाले होते. या आंदोलनाला यश आले, सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्या काही मागण्या मान्य केल्या आहेत, तर काही मागन्या माण्य करण्यासाठी वेळ मागितला आहे.






cmyk